0 3 MAR 2022 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# छत्रपती शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिकावी

## प्रा. बी. एन. जगताप; विद्यापीठातील विज्ञान जागृती सप्ताहाचा समारोप

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्वराज्याला संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्ण बनवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांनी रायगडावर तोफेचे कारखाने उभे केले. नौदलाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या शिवरायांकडून विज्ञाननिष्ठा शिकावी, असे प्रतिपादन मुंबई आयआयटीचे प्रा. ज्येष्ठ शास्त्रज्ञ बी. एन. जगताप यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सीएफसी केंद्रातर्फे आयोजित विज्ञान साप्ताहाच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

प्रा. जगताप म्हणाले, विज्ञान फक्त शहरापर्यंत मर्यादित राहिले, तर कोणतेही शाश्वत बदल होणार नाहीत. मात्र, असे उपक्रम राबवून दुर्गम भागात विज्ञान पोहोचण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे.



कोल्हापूर : शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना ज्येष्ठ शास्त्रज्ञ बी. एन. जगताप, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस.पाटील. डॉ. आर. के. कामत आदी.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'स्तुती' उपक्रमांतर्गत निवड झालेल्या देशभरातील १३ विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. विज्ञानाबरोबरच इतर कौशल्येदेखील विद्यार्थ्यांनी आत्मसात करावीत. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, विज्ञान क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले पाहिजेत. यातून कुतूहल निर्माण होते. नवीन संकल्पना जन्मास येतात. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे आधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी मनोगत व्यक्त केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. सीएफसी केंद्राचे संचालक आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले.

0 3 MAR 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू कारखान्याच्या उपक्रमांचे क्यूबाकडून कौतुक

कागल, ता. २ : क्यूबा सरकारच्या राष्ट्रीय रेशीम प्रकल्प, विज्ञान, तंत्रज्ञान आणि पर्यावरण मंत्रालयाच्या संचालिका श्रीमती ॲडिलेडिस रायझ बारसेनास व राष्ट्रीय रेशीम प्रकल्प, वनस्पती संरक्षण आणि जैव-नैसर्गिक उत्पादन संशोधन केंद्र, हवानाचे संशोधक कार्लोस डेव्हिड क्रुझ मेसा यांच्या शिष्टमंडळाने येथील श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्यास भेट दिली. नवीन उपक्रमांचे आणि अद्ययावत तंत्रज्ञान वापराचे कौतुक केले. क्यूबाच्या शिष्टमंडळाने ऊस जातींची व माती परिक्षण शाळेची माहिती घेतली.

साखर उद्योगाच्या फायद्यासाठी सुधारित ऊस जाती, विकास योजना, उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान, आधुनिक लागवड तंत्रज्ञान, साखर पुनःप्राप्ती याचा अभ्यास करण्यासाठी ही भेट होती.



**कागल : क्यूबाच्या शिष्टमंडळाने छत्रपती शाहू साखर कारखान्यास दिलेल्या भेटीवेळी पर्यावरण मंत्रालय संचालिका श्रीमती ॲडिलेडिस रायझ बारसेनास, संशोधक कार्लोस डेव्हिड क्रुझ मेसा, डॉ. ए. डी. जाधव, डॉ. डी. एच. फाळके, कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण.**

महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील यांच्या शिफारशीने शाहू कारखान्याची निवड केली होती. राहुरी विद्यापीठाच्या वतीने शिष्टमंडळाचे समन्वयक म्हणून राष्ट्रीय कृषी विकास योजनाचे प्रमुख अन्वेषक व नोडल ऑफिसर डॉ. डी. एच. फाळके, शिवाजी विद्यापीठाच्या रेशीम उष्मायन केंद्र व प्राणिशास्त्रचे समन्वयक डॉ. ए. डी. जाधव सहभागी झाले होते.

शाहू कारखान्याच्या शेतकरी हिताच्या योजनांचे, अद्ययावत तंत्रज्ञानाचे व नवीन उपक्रमांची कार्यकारी संचालक जितेंद्र चव्हाण यांनी शिष्टमंडळास माहिती दिली. ऊस विकास अधिकारी के. बी. पाटील उपस्थित होते. कार्यकारी संचालक चव्हाण यांच्या हस्ते राजर्षि छत्रपती शाहू महाराज यांचा पुतळा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन पारंपरिक पद्धतीने परदेशी पाहुण्यांचा सत्कार केला.

लोकमत

# प्रकाश पवार यांना मराठवाडा साहित्य परिषदेचा पुरस्कार

कोल्हापूर : विद्यापीठातील राज्यशास्त्र



विभागाचे प्राध्यापक डॉ. प्रकाश पवार यांना त्यांच्या 'भारतीय राज्यसंस्था आणि सामाजिक न्याय' या ग्रंथाला मराठवाडा साहित्य परिषदेने विशेष वाङ्मय पुरस्कार जाहीर केला आहे. रोख अकरा हजार रुपये, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्काराचे वितरण २० मार्चला सायंकाळी साडेपाच वाजता औरंगाबाद येथे साहित्य परिषदेच्या डॉ. ना. गो. नांदापूरकर सभागृहात डॉ. सतीश साळुंके यांच्या हस्ते होणार आहे.

पुण्यनगरी

# खगोलशास्त्रीय घटना अभ्यासाव्यात

## डॉ. डॉ. एम. व्ही. टाकळे यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ताऱ्यांची उत्पत्ती, स्थिती आणि अंत यांचा अभ्यास करणे खूप रंजक बाब आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी खगोलशास्त्रीय घटनांचा अभ्यास करावा, असे प्रतिपादन डॉ. एम. व्ही. टाकळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

आजादी का अमृत महोत्सवाचे औचित्य साधून डीएसटी- स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताहानिमित्त व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. दि. २७ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज ज्युनिअर कॉलेज, पन्हाळा आणि जीएसएसपीयू कॉलेज, बेळगावच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली. या विद्यार्थ्यांना विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेधा पानसरे आणि मराठी विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि शालेयोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले.

डॉ. टाकळे यांनी ताऱ्यांच्या उत्क्रांतीचा क्रम, खगोलीय विश्वाचे आयुर्मान, आणि विविध नक्षत्रसमूहांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. डॉ. एम. व्ही. टाकळे यांचा सत्कार वनस्पतीशास्त्र विभागाचे डॉ. एन. बी. गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सीएफसी विभागाचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे उपस्थित होते. नॅनो सायन्स विभागाच्या डॉ. जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

03 MAR 2022 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd-1962
NAAC 'A++'Grade

## ५८ वा वार्षिक दीक्षांत समारंभ (आभासी पद्धतीने)

# सर्व संलग्नित तसेच स्वायत्त महाविद्यालये व विद्यार्थ्यांसाठी अधिसूचना

- शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ विद्यापीठाच्या मुख्य इमारतीतील राजर्षी शाहू सभागृहात शनिवार दिनांक ०५ मार्च, २०२२ रोजी सकाळी १०.४५ पासून ऑनलाईन पद्धतीने संपन्न होत आहे. या समारंभासाठी अध्यक्ष म्हणून श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य व मा. कुलपती, शिवाजी विद्यापीठ तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मा. डॉ. दिनकर साळुंखे, डायरेक्टर, इंटरनॅशनल सेंटर फॉर जेनेटीक इंजिनिअरींग अ‍ॅन्ड बायोटेक्नॉलॉजी, नवी दिल्ली व सन्माननीय अतिथी मा. नामदार श्री. उदय सामंत, मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य हे ऑनलाईन उपस्थित राहणार आहेत.

- विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयान्वये महाविद्यालयीन स्तरावर होणारे पदवी वितरण कार्यक्रम कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे होणार नाहीत व सर्व पदवी प्रमाणपत्रे अर्जावरील नमूद पत्त्यावर पोष्टाव्दारे पाठविण्यात येतील.

- सदर समारंभ ऑनलाईन पध्दतीने होणार असल्याने व सर्व पदवी प्रमाणपत्रे व पारितोषिक प्रमाणपत्रे पोष्टाद्वारे पाठविण्यात येणार असल्याने **विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपस्थित राहू नये,** अशा सर्व विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठ संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in/58convocation) या सदरात प्रसिद्ध करण्यात आली आहे.

- ५८ व्या दीक्षांत समारंभाचे थेट प्रसारण दिनांक ०५/०३/२०२२ रोजी सकाळी १०.४५ ते दुपारी १२.०० पर्यंत You tube Link : https://www.youtube.com/c/ShivVarta/ व्दारे पाहता येईल.

दीक्षांत विभाग
दि.: ०३/०३/२०२२

गजानन पळसे
प्र.संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ